मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक


# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३१५ वा ● शनिवार, ता. २४ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी आरोपींवर कडक कारवाई करा- जिजाऊ ब्रिगेड

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणेच्या शरीरावर मारहाणीचे अनेक वळ आढळले असल्यामुळे ही केवळ आत्महत्या नसून हा खूनाचा प्रकार असण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांनी सर्व बाजूंनी निष्पक्ष चौकशी करून आरोपींवर कडक कारवाई करावी. हुंडाबळी, खून, आत्महत्येस प्रवृत्त करणे यासारखी कडक कलमे लावून आरोपींवर गुन्हे दाखल करावेत. वैष्णवी हगवणे यांची जाऊ मयुरी यांचाही छळ करून त्यांना घराबाहेर काढले आहे. त्यांनीसुद्धा छळाची तक्रार महिला आयोग व पोलीसांकडे यापूर्वीच केली आहे. याकडे दुर्लक्ष करून कारवाई न करणारांची चौकशी करून त्यांच्यावर देखील कारवाई करावी, अशी मागणी पुणे जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली.

ही मागणीचे पत्र ब्रिगेडच्या पुणे जिल्हाध्यक्षा मनिषा हेमबाडे, सचिव वृषाली साठे, उपाध्यक्षा शितल घरत, विभागीय अध्यक्षा सुनिता शिंदे यांनी दिले. पत्र आयुक्तांच्या वतीने सहायक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांनी स्वीकारले.

यावेळी मराठा सेवा संघाचे प्रकाश जाधव, शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, संभाजी ब्रिगेडचे कार्याध्यक्ष वैभव जाधव, अशोक सातपुते, दत्तात्रय कांगळे उपस्थित होते.




## Two Saint One Thought पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

**पुणे । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील पेडगावचे सुपुत्र प्रा. कृष्णा भगवान घोलप लिखित संत शेख महंमद महाराज व संत तुकाराम महाराज यांच्यावर आधारित Two saint One Thought (दोन संत एक विचार) या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा सोमवारी ता.१९ मे रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे मराठी विभाग प्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या हस्ते व राज्यशास्त्र अभ्यासक व लेखक डॉ. श्रीरंजन आवटे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला. यावेळी लेखक प्रा.कृष्णा घोलप म्हणाले, संत शेख महंमद महाराज व संत तुकाराम महाराज यांनी घालून दिलेली सामाजिक सलोख्याची शिकवण एकत्रितपणे या पुस्तकात मांडली असुन ती जागतिक दर्जावर नेण्यास या पुस्तकाचा खारीचा वाटा असणार आहे. हे पुस्तक इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत उपलब्ध असून ते आपण खरेदी करा, वाचा तसेच हे पुस्तक बर्थडे फंक्शन, लग्न समारंभ किंवा इतर कार्यक्रमास भेट म्हणून द्या. याने संत शेख महंमद महाराज व संत तुकाराम महाराज यांची शिकवण जगासमोर जाईल.



# फुले सुपर बायोमिक्स शेतकऱ्यांसाठी वरदान- कुलगुरू डॉ. शरद गडाख

**राहुरी । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ उत्पादीत फुले सुपर बायोमिक्स हे जैविक उत्पादन शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. या उत्पादनामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चामध्ये अनेक प्रकारच्या किडी व रोगांपासून त्यांच्या पिकांचे संरक्षण करता येणार आहे. याचा जास्तीत जास्त शेतकरी बंधूंनी फायदा घ्यावा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभागामध्ये फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाच्या प्रयोगशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. शरद गडाख बोलत होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषीभूषण सुरसिंग पवार, वनस्पती रोग शास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अण्णासाहेब नवले, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले व वनस्पती रोग शास्त्र व अनुजीवशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. संजय कोळसे उपस्थित होते. कुलगुरू डॉ. गडाख मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले, यावर्षीच्या खरीप हंगामासाठी विद्यापीठाने ११ टन कांदा बियाणे उत्पादित केले. याचबरोबर अन्य बियाण्यांचे बीजोत्पादन, रोपवाटिका, जीवाणू खते, जैविक कीडनाशके या निविष्ठांच्या विक्रीतून विद्यापीठाचे महसुली उत्पन्न वाढत आहे. या महसुली उत्पन्नाचाच उपयोग विद्यापीठ संशोधनासाठी करीत असून विद्यापीठात होत असलेले संशोधन शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे.

डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करताना म्हणाले की फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाच्या निर्मितीमुळे शेतकऱ्यांची अनेक दिवसांची असलेली मागणी पूर्ण झाली आहे. या जैविक उत्पादनामध्ये पाच प्रकारच्या जैविक बुरशी व सहा प्रकारचे जिवाणू एकत्रित केले आहेत. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने फायदा होईल असे शेतकरीभिमुख संशोधन व उत्पादन करण्याचे महत्त्वाचे काम डॉ. अण्णासाहेब नवले व त्यांच्या टीमने केली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. अण्णासाहेब नवले म्हणाले, फुले सुपर बायोमिक्स हे अतिशय गुणकारी उत्पादन असून हवेतून व जमिनीतून होणाऱ्या रोगांवर अत्यंत प्रभावी आहे हे उत्पादन शेतीसाठी मोठे वरदान ठरेल. हे उत्पादन शेतकऱ्यांना निश्चितपणे उपयोगी पडणारे आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी कृषिभुषण सुरसींग पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पावडर व द्रव स्वरूपातील फुले सुपर बायोमिक्स या उत्पादनाचे लॉन्चिंग तर त्यासंबंधी माहिती असणाऱ्या माहितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

.याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात राहुरी येथील शेतकरी प्रतिनिधी मिनीनाथ तनपुरे यांना मान्यवरांच्या हस्ते जैविक उत्पादनांची किट यावेळी देण्यात आली. या कार्यक्रमासाठी हळगाव कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे विद्यापीठातील विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. संजय कोळसे यांनी मानले.

## २७ मे रोजी माढा येथे केळी परिषद

**नेवासा । विजय खंडागळे**

महाराष्ट्र राज्य केळी उत्पादक शेतकरी संघ आयोजित तिसरी राज्यस्तरी केळी परिषद मंगळवारी ता.२७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता जगदाळे मंगल कार्यालय, वैरागरोड, माढा, ता. माढा, जि. सोलापूर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती केळी उत्पादक शेतकरी संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पुरूषोत्तम सर्जे यांनी दिली. या परिषदेत महाराष्ट्रातील केळी शेतीचे आजचे चित्र सर्वांच्या नजरेसमोर आहे. केळी पिकाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती बरीचशी नाजूक झाली असून केळी पिकाच्या समस्या वाढत आहेत. या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी केळी पिकाच्या शेतीतील विचारवंत आणि केळी पिकाशी पुरक उद्योजकांनी एकत्रित येवून या परिस्थितीवर योग्य चर्चा करून त्याचे कारण शोधून त्याच्यावर ठोस उपाययोजना सुचविण्याची गरज निर्माण झाली. केळीचा शालेय पोषण आहारामध्ये समावेश, हमीभाव, पिकविमा, केळी या पिकाचा भाऊसाहेब फुंडकर योजनेत समावेश अशा अनेक गरजेची पुर्तता करण्यासाठी केळी उत्पादक शेतकरी संघाच्या वतीने या परिषदेचे आयोजन केलेले आहे. या परिषदेत प्रमुख मार्गदर्शक किरणभाऊ चव्हाण संस्थापक अध्यक्ष केळी उत्पादक शेतकरी संघ यांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच उद्घाटक म्हणून मा. खासदार धैर्यशील मोहीते पाटील, मा. आमदार अभिजीत आबा पाटील व मा. आमदार नारायण आबा पाटील, मा. दादासाहेब साटे, मा. जिल्हा कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले हे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अतुलनाना माने पाटील उपस्थित राहणार आहेत. योगेश महसे यांचे केळी उत्पादन खत व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. मनोहर पाटील नमो बायो प्लॅन्ट महाराष्ट्र हेड यांचे खत व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन, डॉ. विद्या मनोहर सोनवणे यांचे केळी व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन होईल. राज्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी केळी परिषदेस उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन संघाचे जिल्हाध्यक्ष पुरूषोत्तम सर्जे यांनी केले. यावेळी अतुलनाना माने पाटील, डॉ. हनुमंत चिकणे, किशोर चौधरी, छगन गुजर, उत्तम पाटील, राजेश नवाल, पंढरीनाथ इंगळे, सचिन कोरडे, महेंद्र पाटील, वैभव पोळ, पुरुषोत्तम सर्जे, धिरज पाटील, ओंकार पवार, केशव गायकवाड, रत्नाकर पाटील आदी उपस्थित होते.

# मातंग समाजाच्या आरक्षण संदर्भात येत्या १५ दिवसांत प्रश्न मार्गी- महसूलमंत्री बावनकुळे

### आरक्षणाच्या वर्गीकरणासंदर्भात मातंग समाजाचा जनआक्रोश मोर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या वर्गीकरणासंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांनी याची अंमलबजावणी सुरू केली असताना, महाराष्ट्रात मात्र अद्याप काहीच हालचाल झालेली नाही. त्यामुळे सरकारला जाग आणण्यासाठी मातंग समाजाच्या वतीने मुंबईत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यासाठी अहमदनगर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मातंग समाज गेला होता.

यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मातंग समाजाच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसंदर्भात येत्या १५ दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात येईल. महसूल मंत्री आणि प्रदेशाध्यक्ष म्हणून मी याची संपूर्ण जबाबदारी घेतो, असे ठाम आश्वासन दिले. आंदोलनात सकल मातंग समाजातर्फे विविध मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये आरक्षणाचे वर्गीकरण करून मातंग आणि त्यातील उपजातींना शिक्षण, नोकरी आदी क्षेत्रात आरक्षणाची तरतूद करणे, वैद्यकीय व तंत्रशिक्षण यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये वर्गीकरणानुसार प्रवेश व सवलती देणे, आंध्र प्रदेशातील मादिगा समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणारे मॉडेल स्वीकारणे आणि अनुसूचित जातीसाठी राखीव निधीच्या सुरक्षेसाठी तेलंगणाच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा करण्याच्या



मागण्या समाविष्ट होत्या. मोर्चात आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, आमदार जितेश अंतापुरकर, आमदार हेमंत ओगले, माजी मंत्री रमेश बागवे, दिलीप कांबळे, लक्ष्मण ढोबळे, माजी आमदार अविनाश घाटे, संजय ससाणे, सुधाकर भालेराव, राम गुंडिले, राजू आवळे, विष्णूभाऊ कसबे, सचिन साठे, मारुती वाडेकर, सुधीर धूपे, पंडित सूर्यवंशी, रणधीर कांबळे, सुखदेव अढागळे, अनिल हातागळे, चंद्रकांत काळोखे, मुखेडकर, सुनिल उमाप, सागर खरे, बाळासाहेब लोंढे, सचिन भारस्कर, कैलास आरणे, रवि शेलार, अरूण बोरुडे, प्रा.सोळसे, रवी शेलार,शिवा बोडगेआदी मान्यवर व सामाजिक नेते उपस्थित होते. सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्याच्या वतीने साद घातल्यानंतर एक लाखांहून अधिक समाजबांधवांची उपस्थिती आझाद मैदानात दिसून आली. पिवळ्या झेंड्यात लाल सुर्याचे निशाण असलेले झेंडे हातात घेवुन, गळ्यात पिवळ्या रंगाची सुर्य असलेल्या मफलरी, पिवळे शर्ट, पिवळे कुर्ते, पिवळ्या साड्या तर पिवळे पंजाबी ड्रेस या मोर्चाचे आकर्षण ठरले. घोळकेच्या घोळक्यांनी सर्वच महापुरूषांची नारेबाजी, घोषणाबाजी करत आझाद मैदान दणदणुन टाकले. साठ ते सत्तर टक्के समाज स्वखर्चाने आला, हे या मोर्चाची वैशिष्ट्यपूर्ण बाब ठरली. सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार महाराष्ट्रात आरक्षण उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, या मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्तरावर मागास राहिलेल्या मांग, मातंग व इतर घटक समाजाला आरक्षणाचे वर्गीकरण करून न्याय मिळावा, यासाठी लाखाच्या संख्येत मातंग समाजातील महिला-पुरूष, ज्येष्ठ नागरिक तर खास करून विद्यार्थी-विद्यार्थिनीं व युवक-युवती या आंदोलनात सहभागी झाले. मोर्चात सत्ताधारी पक्षाचे सर्व आमदार, इतर पक्षाचेही आजीमाजी आमदार, माजी मंत्री तसेच विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी व उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# उपवर्गीकरणाच्या खांद्यावर आरेसेसची लाठी!

मुंबईमध्ये २० मे रोजी अंत्योदयवादी भाजपा आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा प्रायोजित आरक्षण उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी सकल? मातंग मेळावा झाला. भव्य मंडपामध्ये झालेल्या या मेळाव्यास महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यातून मेंढरं हाकून आणणाऱ्या नेत्यांना अजिबात बोलू देण्यात आले नाही. शेवटी-शेवटी तर भाऊबंदकीची स्पर्धा हातापायावर यायला लागल्यावर फडणवीसांच्या पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला! उपस्थित भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी १५ दिवसांत मुख्यमंत्र्यांसमोर बैठक घेण्याचे आश्वासन दिले अर्थात सर्व उपस्थितांच्या तोंडाला पाने पुसून मार्गस्थ केले. परतीच्या प्रवासात सोशल मिडीयावर उपस्थितांनी आपली फसवणूक झाल्याची टीका केली खरी; पण आता वेळ निघून गेली आहे, तुम्ही फसला आहात ! भाजपामध्ये आता दिलीप कांबळेंच्या जागी अमित गोरखेंचे नेतृत्व उभे करण्यात आले आहे. हा मेळावा उपवर्गीकरणासाठी नसून नेतृत्व लादण्यासाठी होता, हेही आता लपून राहिलेले नाही.

भाजपाची सत्ता असली तरी उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे आहेत. शासनाने एकतर्फी निर्णय घेण्याचा प्रयत्न केल्यास त्याला प्रचंड मोठा विरोध होऊ शकतो, हे सरकारला माहित आहे. याचा अर्थ आरक्षणाचे समन्यायी वितरण व्हायला नको का ? तर झाले पाहिजे, पण भाजपा किंवा अन्य कुणीही प्रस्थापित पक्षांनी त्यामध्ये न पडता दलितांमधल्या सर्व जातींनी एकत्र येवून आरक्षणाचा आढावा घेतला तर ते व्यवस्थित होईल. त्यासाठी खूप मोठी चर्चेची घुसळण होण्याची गरज आहे. अशा प्रकारची कोणतीही चर्चा न होता हा निर्णय न्यायालयाने दिला असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत असंख्य अडथळे आहेत. याला खूप वेळ लागेल, हे या समाजातील अनेक पुरोगामी कार्यकर्ते आता बोलून दाखवत आहेत.



**कॉ. महादेव खुडे**

नाशिक

**समाजवार्ता**


१) या प्रश्नामध्ये भाजपाचा हेतू स्वच्छ नव्हता व नाही हे स्पष्ट झाले आहे. या प्रश्नाला पुढे करुन भाजपाला महार- मांग संघर्ष उभा करायचा आहे, हे अनेकांच्या लक्षात आले आहे.

२) आंबेडकरी चळवळीतल्या काही जणांनी उपवर्गीकरणाच्या न्यायालयीन निर्णयाला स्पष्ट विरोध केला असला तरी अनेक कार्यकर्त्यांनी हा प्रश्न दलितांतर्गत चर्चेतून सोडवता येवू शकतो व त्यात अन्य कुणाचा हस्तक्षेप नको, अशी भूमिका मांडत सर्व दलितांसोबत संवाद करायला सुरुवात केली आहे.

३) मातंग समाजाच्या मागासपणाची सामाजिक/आर्थिक कारणे जातवर्गीय शोषण व्यवस्थेत न शोधता ज्यांच्याकडे आजही कोणत्याही साधनसंपत्तीची मालकी नाही त्या नवबौध्दांना शत्रू म्हणून उभे करणे ही आरेसेस- भाजपा ची खेळी आहे, हे लक्षात आल्याने अनेक उपस्थितांनी मेळाव्यानंतर तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत.

४) सत्ताधाऱ्यांनी उभ्या केलेल्या जात अस्मितांच्या चळवळींचे नेतृत्व सत्ताधारीच उभे करत असतात. मातंग समाजाचे नेते सत्ताधारी वर्गानेच नियंत्रित केल्याचे दिसते. हे काँग्रेस व भाजपा दोन्हींच्या काळात घडले आहे. आता उपवर्गीकरणासाठी भाजपाच्या गोटात शिरलेल्या एका कार्यकर्त्याने पूर्वी मांग पुढाऱ्यांची अवसानघातकी चळवळ या शीर्षकाची पुस्तिका लिहिली होती. त्यात १९६७ साली मातंग समाजाचे ६ आमदार निवडून आले होते, असे मांडले आहे. त्यानंतर दोनच वर्षांनी १९६९ साली कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांचे निधन झाले. वैश्विक साहित्याची निर्मिती करणाऱ्या या महान लेखक/नेत्याला मातंग समाजाने या काळात अडगळीत टाकले होते व प्रस्थापितांनी नियंत्रित केलेल्यांचे नेतृत्व स्वीकारले होते. या समाजाची ही दारुण शोकांतिका आहे! गल्लीबोळात अण्णाभाऊंचे पुतळे आणि नेतृत्व मात्र सत्ताधारी पक्षातील नेत्याचे अशा द्विधेत जगणाऱ्या समाजातील कार्यकर्त्यांनी खरेतर आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. आपल्या मागासपणाचा संबंध नवउदारमतवादी आर्थिक रचनेत न शोधता आपल्याच जागृत भावांशी जोडणे, यातून या समाजाची मोठी हानी होणार आहे.२० मे च्या सकल? मेळाव्यात नाईलाजाने महापुरुषांच्या घोषणा दिल्या जात होत्या तरी सत्यशोधक मुक्ता साळवे यांची घोषणा देण्यात आली नाही. मुक्ता साळवे यांनी १८५५ साली लिहिलेल्या निबंधाचे शीर्षक होते मांग-महारांच्या दु:खाविषयी याचा अर्थ याकाळापर्यंत या दोन्ही जातींची सामाजिक/आर्थिक/ शैक्षणिक स्थिती यामध्ये फारसा फरक नव्हता. जोतीराव फुलेंनी अस्पृश्यांकरीता काढलेल्या शाळेत लहुजी साळवे व रानबा महार यांनी आपापल्या जातींची मुले शाळेत आणण्यासाठी परिश्रम घेतल्याची नोंद फुले वाङ्मयात आहे. एकेकाळी फुलेंचा सत्यशोधक वारसा सांगणारे सत्तालोलुप जेव्हा हेडगेवार व आंबेडकर यांचे विचार एक होते असा संघीय प्रचार करतात त्यावेळी उपवर्गीकरणाच्या खांद्यावर संघाची लाठी आहे, हे आता किमान काही जणांच्या लक्षात आले असेलच! तूर्त इतकेच.

# वीजपुरवठा खंडित झाला?
# आता ग्राहकांना मिळणार ५० रुपये प्रतितास नुकसानभरपाई




**अहमदनगर । तुषार सोनवणे**

नगर शहरात महावितरण कंपनीचा मनमानी कारभार सुरू असून नागरिक त्रस्त झाले आहेत तर कंपनी अधिकारी खुद्द राज्यातील सत्ताधारी असलेल्या भाजपासह अजित पवार राष्ट्रवादी पक्षाला जुमानत नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे. त्यामुळे कायदेशिर हक्काचा आधार घेत नागरिकांनी नुकसान भरपाईची मागणी करावी. ६ तासापेक्षा जास्त काळ लाईट केली असेल तर ५० रूपये तासाप्रमाणे कायदेशिर नुकसाभरपाईचा ग्राहकाचा हक्क आहे. वर्धा येथील एका ग्राहकास महावितरणकडून तब्बल ९ लाख १२ हजार रूपये मिळाले आहेत. शहर व परिसरात मागील काही दिवसांपासून वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून प्रचंड उकड्यात आणि विजेअभावी नागरिकांना अक्षरश: हाल सहन करावे लागत आहेत.नेहमीप्रमाणे दर शनिवारी विद्युत महावितरण विभागाकडून मेंटेनन्ससाठी वीजपुरवठा बंद ठेवला जातो. याची नागरिकांनी मानसिक तयारी ठेवलेली असते. मात्र सध्या थोडा जरी वारा, पावसाचे थोडे थेंब जरी पडले वीजपुरवठा खंडित केला जातो. विशेष म्हणजे वीज केव्हा येईल याची कोणतीही निश्चित माहिती नागरिकांना दिली जात नाही.

महावितरणच्या कार्यालयात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, फोन उचलला जात नाही. कधी उचलला गेला तरी कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना उद्धट वागणूक दिली जाते. 'तुमचं लाईट बिल भरलेलं आहे का?' अशा स्वरूपाच्या प्रश्नांनी उलटसुलट बोलले जाते. ही वागणूक संतापजनक असून, सार्वजनिक सेवेतील जबाबदारीचा पूर्ण विसर महावितरणच्या कर्मचाऱ्यांना पडल्याचे दिसून येते. वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे शहरातील अनेक लहान दुकानदार, सेतू कार्यालय, सायबर कॅफे, सलून, वर्कशॉप्स, शालेय आणि महाविद्यालयीन तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची व इतर लघुउद्योगांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. दिवसभरात दोन-तीन वेळा वीज गेलेली असते आणि तेवढ्या वेळात त्यांचा व्यवहार ठप्प होतो. काही व्यावसायिकांनी आपले नुकसान भरून काढण्यासाठी जनरेटरचा आधार घेतला आहे, परंतु इंधन दरवाढीमुळे तोही परवडणारा पर्याय नाही.शहरातील राजकीय पक्ष भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी या प्रश्नावर आंदोलने केली परंतु फक्त आंदोलन करून नागरिकांची समस्या संपणार नाही. नागरिकांना झालेली आर्थिक नुकसान भरपाई या पक्षांनी विद्युत वितरण कंपनीकडून मिळून दिली पाहिजे, राजकीय पुढाऱ्यांनी त्याचबरोबर नागरिकांनी नुकसान भरपाईसाठी आवाज उठवला पाहिजे. याविषयी कायद्यात स्पष्ट तरतूद आहे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL) किंवा कोणतीही वीज वितरण कंपनी ग्राहकांना योग्य कारणाशिवाय किंवा नियमांचे उल्लंघन करून वीज पुरवठा खंडित करते किंवा वीज देत नाही, तर ग्राहक आर्थिक नुकसान भरपाई मागू शकतो. याबाबत भारतीय विद्युत कायदा आणि विद्युत नियामक आयोगाच्या २०१४ च्या नियमावली मध्ये तशा स्पष्ट तरतुदी आहे. ग्राहक नुकसान भरपाई कधी मागू शकतो ? वीजपुरवठा खंडित झाल्यास नुकसान भरपाई : शहरी भागात वीजपुरवठा खंडित झाला असेल आणि ६ तासांपेक्षा जास्त काळ (उदा., ओव्हरहेड वायर तुटणे) किंवा २४ तासांपेक्षा जास्त काळ (ट्रान्सफॉर्मर बिघाड) वीज सुरू झाली नाही, तर प्रत्येक तासासाठी ग्राहक ५० रुपये नुकसान भरपाई मागू शकतो. ग्रामीण भागात : ट्रान्सफॉर्मर बिघाडामुळे वीजपुरवठा ४८ तासांपेक्षा जास्त खंडित झाल्यास, प्रत्येक तासासाठी ५० रुपये नुकसान भरपाई मागता येऊ शकते. वर्ध्यातील एका ग्राहकाला ९ लाख १२ हजार रुपये इतकी नुकसान भरपाई मिळाली, अशी माहिती विद्युत लोकपालच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. व्होल्टेज चढ-उतारामुळे नुकसान : जर वीजपुरवठ्यातील व्होल्टेजच्या चढउतारामुळे ग्राहकांच्या उपकरणांचे नुकसान झाले, तर भारतीय विद्युत नियम ५४ नुसार वीज कंपनीला नुकसान भरपाई देणे बंधनकारक आहे. तक्रार निवारणाची प्रक्रिया : ग्राहक तक्रार निवारण मंच (CGRF) कडे तक्रार दाखल करू शकतो. ही प्रक्रिया विनामूल्य आहे आणि दोन महिन्यांत निकाल देणे बंधनकारक आहे. जर CGRF चा निर्णय समाधानकारक नसेल, तर ग्राहक विद्युत लोकपाल (Ombudsman) कडे अपील करू शकतो. तक्रार दाखल करण्यासाठी https://www.mahadiscom.in/consumer/consumer-grievances-redressal-forum_mr/ ऑनलाइन तक्रार दाखल करण्यासाठी https://edaakhil.nic.in/edaakhil/ वीज खंडित झाल्याची तारीख, वेळ, आणि त्यामुळे झालेले नुकसान (उदा., उपकरणांचे नुकसान, व्यवसायाचे नुकसान) यांचे पुरावे गोळा करा. तक्रार दाखल करा : महावितरणच्या ग्राहक सेवा केंद्रात (१९१२ किंवा १८००-२१२-३४३५) किंवा वेबसाइटवर तक्रार नोंदवा. कायदेशीर मार्ग : CGRF किंवा विद्युत लोकपालाकडे तक्रार दाखल करा. गरज पडल्यास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे जाऊ शकता. नुकसान भरपाई मागण्यापूर्वी वीज खंडित होण्याचे कारण (उदा., तांत्रिक बिघाड, बिल थकबाकी, इ.) तपासा. जर कंपनीच्या चुकीमुळे वीजपुरवठा खंडित झाला असेल, तर नुकसान भरपाई मिळण्याची शक्यता जास्त आहे. अधिक माहितीसाठी महावितरणच्या वेबसाइटला भेट द्या https://www.mahadiscom.in/en/useful-information-consumers/ नुकतेच अहिल्यानगर विद्युत महावितरण कंपनीला उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यात तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. प्रत्यक्षात महावितरणची कामगिरी अत्यंत निराशाजनक असताना त्यांना मिळालेला हा पुरस्कार वशिल्याने मिळाला की काय अशी सामान्य नागरिकात चर्चा आहे. शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या आणि मोठ्या पगारावर काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांकडून कामात कसूर केली जात आहे. या सर्व प्रकारामुळे नागरिक वैतागले असून, त्यांनी महावितरणच्या मनमानी कारभाराला लगाम घालण्याची मागणी केली आहे. सर्व विजग्राहकांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या लोकप्रतिनिधीला विजमंडळात राजकीय आंदोलन करण्याऐवजी नुकसान भरपाईचे फॉर्म भरण्यास सांगून ५० रूपये प्रति तासाप्रमाणे आर्थिक नुकसान भरपाई पदरात पाडून घ्यावी.

# वैद्यकीय आरोग्याधिकारी पदावर पुर्ववत रुजू करुन घ्यावे

## डॉ. बोरगे यांची यशवंत डांगेंकडे मागणी

**अहमदनगर । लहू दळवी**



अहिल्यानगर महानगरपालिकेचे निलंबित वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. अनिल बोरगे यांनी प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगेंकडे पुन्हा एकदा जोरदार मागणी केली आहे की, त्यांना वैद्यकीय आरोग्याधिकारी पदावर पुर्ववत रुजू करावे.

तसेच बोगस व अर्धवट कागदपत्रांच्या आधारे अहवाल देणाऱ्या त्रिसदस्यीय समितीवर कार्यवाही करावी, अशीही त्यांची ठाम भूमिका आहे. डॉ. बोरगे यांनी याबाबत सविस्तर पत्र देत आपली बाजू मांडली आहे. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, ''माझी नेमणूक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ अंतर्गत वैद्यकीय आरोग्याधिकारी पदावर झाली होती. मात्र, शासनाची पूर्वपरवानगी न घेता मला सक्तिच्या रजेवर पाठविण्यात आले, जे कायदेशीरदृष्ट्या अयोग्य आहे.''

**कामगिरीत सुधारणा, तरीही कारवाई?**

बोरगे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी कार्यकाळात आरोग्य विभागाच्या रँकिंगमध्ये लक्षणीय सुधारणा साधली होती. जानेवारी २०२५ अखेर मनपाचा क्रमांक २६ वरून १६ पर्यंत पोहोचला. ''ही प्रगती माझ्या कार्यकाळात झाली असून, अचानकपणे त्रिसदस्यीय समितीमार्फत माझ्यावर अन्यायकारक कारवाई करण्यात आली,'' असे ते म्हणाले.

**बोगस अहवालावरून गुन्हा दाखल, पण...**

डॉ. बोरगे यांनी समितीच्या अहवालाला बोगस व त्रुटीपूर्ण ठरवत स्पष्ट केले की, ''संबंधित समितीने अर्धवट कागदपत्रांच्या आधारावर अहवाल तयार केला. यामुळे मला कारणे दाखवा नोटीस मिळाली आणि महापालिकेने गुन्हा दाखल केला.'' मात्र कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्र. १८८/२०२५ प्रकरणात सखोल चौकशीनंतर त्यांचे निर्दोषत्व स्पष्ट झाले आणि त्यांचे नाव गुन्ह्यातून वगळण्यात आले.

**शासन निर्णयाने निलंबन संपुष्टात?**

डॉ. बोरगे यांनी निदर्शनास आणून दिले की, शासन निर्णयानुसार अशा परिस्थितीत निलंबन आपोआप संपुष्टात येते. त्यामुळे त्यांनी ''तात्काळ सेवा पुर्ववत करावी, तसेच निलंबन काळातील वेतन आणि भत्ते अदा करावेत,'' अशी मागणी केली आहे.

**त्रिसदस्यीय समितीवर कारवाईची मागणी**

या संपूर्ण प्रकरणात अहवाल सादर करणाऱ्या त्रिसदस्यीय समितीवर देखील त्यांनी रोष व्यक्त केला. ''समितीनेच अहवालात अपूर्ण दस्तऐवज आहेत असे नमूद करूनही त्यावर आधारित कारवाई केली गेली, जी अन्यायकारक आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे,'' असा ठाम पवित्रा त्यांनी घेतला आहे.

प्रकरणाने अहिल्यानगर महापालिका प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण केले असून, वैद्यकीय आरोग्य यंत्रणेतील नियोजन व निर्णय प्रक्रियेची पारदर्शकता ही यापुढील काळात अधिक तपासणीस पात्र ठरणार आहे.
















# अहमदनगर स्थापना दिनानिमित्त दुर्मीळ वस्तूंसह गडकिल्ल्यांचे चित्रप्रदर्शन

**अहमदनगर । आबिदखान**

अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापनादिनाचे औचित्य साधत मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, इतिहासप्रेमी मंडळ व रहमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने नाणीसंग्राहक सचिन डागा व १५० पेक्षा जास्त गडकिल्ल्यांची भ्रमंती करुन त्यांची उत्कृष्ट फोटोग्राफी करणारे ठाकुरदास परदेशी यांच्या फोटो प्रदर्शनाचे आयोजन रविवारी, सोमवारी ता. २५ व २६ मे रोजी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात आयोजित करण्यात आले असल्याची माहिती मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी दिली.

या प्रदर्शनात जुने ऐतिहासिक नकाशे, जूनी कागदपत्रे, जुने संस्थानिक राजांची तिकटे, पोस्टाची तिकीटे, जुने कॉईन्स, निजामशाही- शिवशाही- ब्रिटिशकालीन जुन्या नोटा, फॅन्सी नंबर्स नोटा, नोटांची बंडले आदी अनेक महत्त्वाच्या संग्रहीत दुर्मिळ वस्तू प्रदर्शनात पहायला मिळतील.

प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य असून या संधीचा सर्व नगरकरांनी व इतिहासप्रेमींनी आवश्य लाभ घ्यावा असे, आवाहन इतिहासप्रेमी मंडळाच्यावतीने आसिफ खान, अभिजित वाघ, युनूसभाई तांबटकर व भैरवनाथ वाकळे यांनी केले.

# राज्य शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न मार्गी लावणार- नीताताई ढवण

## रा.काँ. अजित पवार दिव्यांग आघाडीच्या वतीने दिव्यांग जोडो अभियानाचा शुभारंभ

**शहरातील सर्वच घटकातील नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ व्हावा यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली आम्ही नागरिकांमध्ये योजनांची माहिती जनजागृती करीत आहोत. दिव्यांग व्यक्तींच्या व्यथा खूप गंभीर असून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामाजिक बांधिलकी जोपासत नक्कीच मदतीचा हात देईल. प्रदेशाध्यक्ष नीता ताई ढवण यांच्या माध्यमातून शहरातील दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न सोडविण्याचे काम केले जाईल, असे मत शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी व्यक्त केले.**

**अहमदनगर । लहू दळवी**

दिव्यांग व्यक्तींचे विविध प्रश्न प्रलंबित असून ते सोडविण्याचे काम राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हेच करू शकतात. शासनाच्या विविध योजना दिव्यांग व्यक्तींसाठी असून त्या पोचविण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते करतील. यासाठी राज्यभर दिव्यांग जोडो मोहिमेचा आरंभ नगर शहरात झाला.

काही लोक दिव्यांग सर्टिफिकेट मिळवून शासकीय नोकरीत समाविष्ट होत आहेत, मात्र खरा दिव्यांग व्यक्ती या नोकरीपासून वंचित राहत आहे. यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून शासनाला गंभीर दखल घेण्यासाठी भाग पाडू. आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरातील दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न मार्गी लागत आहे. दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या माध्यमातून मिळणारे मानधन वेळेत व वाढून मिळवण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिव्यांग आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष नीता ताई ढवण यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिव्यांग आघाडीच्या वतीने दिव्यांग जोडो अभियानाचा शुभारंभ प्रदेशाध्यक्ष नीताताई ढवण यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, सामाजिक कार्यकर्ते संभाजी पवार, युवक अध्यक्ष इंजि केतन क्षीरसागर, विद्यार्थी आघाडीचे अध्यक्ष वैभव ढाकणे, राजेश भालेराव, नितीन घोडके, गणेश बारस्कर, लक्ष्मण पोकळे, जमीर पठाण, मच्छिंद्र खेडकर, बाळासाहेब गायकवाड आदी उपस्थित होत


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# फेरसर्व्हे केल्याशिवाय काम सुरू होणार नाही- मुख्याधिकारी विजया घाडगे

## नवीन पाणी योजनेसंदर्भात शेवगाव कृती समितीची बैठक संपन्न

**शेवगाव । नरहरी शहाणे**

शहरामध्ये होऊ घातलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी शेवगाव पंचायत समितीच्या मारुतराव घुले पाटील सभागृहामध्ये शेवगाव कृती समितीच्या सदस्यांची बैठक गुरुवारी ता. २२ रोजीआयोजित केली होती. यामध्ये कृती समितीचे सदस्य अरुण मुंढे व प्रा. किसन चव्हाण यांनी पाणी योजने संदर्भात अनेक त्रुटी समोर आणल्या. नगरपरिषदेचे सल्लागार यांनी त्या त्रुटी मान्य करून तातडीने फेरसर्व्हेक्षण करण्यात येईल असे सांगितले. शेवगाव शहरात होऊ घातलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या अनेक त्रुटी त्यावर उपाययोजना या संदर्भात अधिकारी, ठेकेदार व कृती समितीची सदस्य यांच्यामध्ये चर्चा झाली या चर्चेमधून ज्या त्रुटीसमोर आल्या त्या त्रुटीवर उपाययोजना व पाईपलाईनचा फेरसर्व्हे केल्याशिवाय पुढील पाईपलाईन टाकण्याचे काम बंद करा, अशी मागणी कृती



समितीचे सदस्य अरुण मुंढे व किसन चव्हाण यांनी केली, यावर सविस्तर चर्चा होऊन शेवगाव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी घाडगे यांनी पाणी योजनेचा फेरसर्व्हे केल्याशिवाय पुढील काम करण्यात येणार नाही अशी ग्वाही दिली. त्यानंतर या बैठकीचा समारोप करण्यात आला. या चर्चेमध्ये शहरातील अनेक पदाधिकाऱ्यांनी भाग घेतला व शेवगावमधील विविध प्रभागामध्ये चाललेल्या पाणी योजनेबाबत तक्रारी केल्या. यावर ठेकेदार यांनी उत्तरे देत आलेल्या तक्रारींची दखल घेऊन याबाबत चौकशी करून दुरुस्ती केली जाईल असे सांगितले. या बैठकीस शेवगाव कृती समितीचे सदस्य व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य सचिव प्रा. किसन चव्हाण, शेवगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती अरुण लांडे, शेवगाव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे, शेवगावचे माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, शिवसेनेचे एकनाथ कुसळकर, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख, डॉ. अमोल फडके, कमलेश गांधी, हरीश भारदे, सालार शेख, भागा डाके, बंडू मेहर, प्रेमसुख जाजू, सलीम जिलानी, बबन पवार सर, कैलास तुजारे, गणेश साळवे, उमर शेख, रघुनाथ खेडकर तसेच शेवगाव नगर परिषदेचे पाणीपुरवठा योजनेचे उपअभियंता जगदीश जाधवर आदींसह शेवगाव शहरातील नागरिक उपस्थित होते.



# अशोक ढोले यांना पुणे जिल्हा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघातर्फे दिला जाणारा पुणे जिल्हा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार शेवगाव तालुक्याचे भूमिपुत्र अशोक ढोले यांना नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ.सत्यजित तांबे यांच्या हस्ते यांना प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील, महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, सचिव रेवणनाथ कर्डिले, पुणे विभागाच्या अध्यक्षा डॉ. नेहा बोरसे उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाची द्विदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी हा पुरस्कार देण्यात आला.

अशोक ढोले हे शेवगाव तालुक्यातील आव्हाने येथील भूमिपुत्र असून ३ री ला असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यानंतर खूप हालाकीच्या परिस्थितीत त्यांचे शिक्षण त्यांनी स्वतःच कष्ट करून पूर्ण केले. ते सध्या पुण्यातील सिंबायोसिस या नामांकित महाविद्यालयामध्ये गेल्या २० वर्षापासून अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांनी मागील वर्षी भारत सरकार, सांस्कृतिक मंत्रालयातर्फे हैदराबाद येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण२०२० यावर २१ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले.

यासाठी महाराष्ट्र राज्यातून निवडण्यात येणाऱ्या १० शिक्षकांमध्ये त्यांची निवड झाली होती. तसेच त्यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० मध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य केले. त्यांच्या अशा अनेक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाकडून त्यांना हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# गुरुचे आगमन हीच भक्तांची दिवाळी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

ज्याप्रमाणे आयोध्यामध्ये राम येतात तेव्हा दिवाळी होती. श्रीरामपूरात गुरुचे आगमन होते तेव्हा भक्तांची दिवाळी साजरी होते असे प्रतिपादन भक्ताम्बरवाले बाबा ज्योतिषाचार्य डॉ. आचार्य प्रणाम सागरजी महाराज यांनी केले. भक्ताम्बरवाले बाबा यांचे शहरात गुरुवारी सकाळी आगमन झाले. त्यांचे भव्य स्वागत बेलापूररोडवर करण्यात आले.

यावेळी समाजबांधवांनी चौकाचौकामध्ये महाराजांचे स्वागत केले. लोकमान्य टिळक वाचनालयासमोर असलेल्या आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या प्रेरणेतून उभारण्यात आलेल्या कीर्तीस्तंभाचे त्यांनी दर्शन घेतले. त्यानंतर दिगंबर जैन मंदिरात आचार्य प्रणाम सागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवंताचे अभिषेक व पूजन झाले. यावेळी अध्यक्ष संजय कासलीवाल, विश्वस्त सुभाष चुडीवाल, गुलाब झांजरी, जितेंद्र कासलीवाल, मयूर पाटणी, महावीर काला, पंकज पांडे, बहु मंडळाचे संगीता कासलीवाल, चंदना महिला मंडळाचे रेखा पाटणी, शांतीसागर पाठशाळाचे प्रमुख प्रिया अग्रवाल, वीर सेवादलाचे प्रितम पांडे, पंचाअमृत ग्रुप, बहु मंडळ, महावीर युवा मंच आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भक्ताम्बरवाले बाबा आचार्य प्रणाम सागरजी महाराज यांचे रोज सकाळी आठ ते नऊ भक्ताम्बर पाठचे आयोजन करण्यात आले. तसेच दुपारी तीन ते चार शंका समाधान व सायंकाळी ७ वाजता आनंदयात्रेचे आयोजन करण्यात आले.यावेळी भक्ताम्बरवाले बाबा म्हणाले, संतांचे आगमन हा परमात्माकडे जाण्याचे संदेश देते. ज्या ठिकाणी संतांच्या प्रवेश होतो भक्तांचे पुण्याच्या प्रवेश होतो. श्रीरामपूरकर पावन स्थळ श्रीरामाच्या आगमनाचे संदेश इथे भगवानाला पूजनापेक्षा गुरुची सेवा होते.

महाराष्ट्रात देशातून व्यक्ती भगवानास नाही, गुरूला भेटायला येतात. याठिकाणी तुकाराम महाराज, साईबाबा, संत गाडगेबाबा प्रत्येक भक्त महराष्ट्रात भारतातून गुरूना भेटण्यासाठी येतात. हे सौभाग्य श्रीरामपूरचे गुरू श्रीरामपूरकरांना भेटायला आले, असे यावेळी त्यांनी सांगितले.



# भोकर सबस्टेशनच्या विरोधात ग्रामस्थांचा आक्रोश

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

भोकर सबस्टेशनमध्ये सध्या उन्हाळ्यात पाणीटंचाई अभावी शेती वीजपुरवठ्याचा लोड नसतानाही गावठाण सिंगलफेज वीजपुरवठा लोड अभावी खंडीत करण्यात येतो. या खंडीत वीजपुरवठ्यास त्रस्त झालेल्या मुठेवाडगाव ग्रामस्थांनी भोकर सबस्टेशन अधिकाऱ्यांना घेराव घातला. भोकर सबस्टेशच्या उत्तर बाजुच्या गावठाण फिडरमधून भोकर, घुमनदेव, कमालपूर, मुठेवाडगांव माळवाडगांव घरगुती वीजपुरवठा होतो. अवकाळी पावसामुळे हवेत प्रचंड उकाडा जाणवत आहे. रात्री वीजपुरवठ्याची सध्या गरज असताना, रात्रंदिवस वीजपुरवठा खंडित होत आहे. मुठेवाडगांवचे सरपंच सागर मुठे यांच्या समवेत संतप्त ग्रामस्थांनी भोकर सबस्टेशन गाठले.त्याठिकाणी कनिष्ठ अभियंता मुळे हजर नसल्याने त्यांनी सरपंच सागर मुठे यांच्याशी संपर्क साधून सध्या लोड बसत नसल्याने गावठाण बंद ठेवावे लागते. आपल्या मुठेवाडगांव व माळवाडगांव शेती महामंडळाचे हद्दीलगतचे काही रोहित्र हरेगांव सबस्टेशनला जोडण्यात येणार असल्याचे सांगितले. लाईनमन हळणोर यांनी निवेदन स्विकारले. यावेळी सरपंच सागर मुठे यांनी उपस्थित कर्मचारी यांना सांगितले, आम्हाला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. सध्या पन्नास टक्के विहीर, बोअरला पाणी नसताना सबस्टेशन ओव्हर लोड कसे? लवकरात लवकर गावठाण विजपुरवठा सुरळीत झाला नाही तर खोकरफाटा येथे रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावेळी सरपंच सागर मुठे, जालिंदर मुठे, सेवानिवृत्त प्रा. रंगनाथ कोळसे, लक्ष्मण पाचपिंड, गोकुळ भा.मुठे, संपतराव मुठे, पोलीस पाटील दत्तात्रय मुठे, आण्णासाहेब भा.मुठे, रंजक चौधरी, शिवाजी दिघे, गणेश नेहे, बाळासाहेब भोंडगे, इंदरभान मुठे, संतोष मुठे, प्रदिप मुठे, सुनिल मुठे, दिलीप मुठे आदी उपस्थित होते.



# देशमुख यांच्या कथाकथनात रमले समर कॅम्पमधील लेकरं

**अहमदनगर । प्रतिनिधी**

क्रिएटिव्ह टॅलेंट २०२५ने आयोजित केलेल्या समर कँपमधे बाळासाहेब देशमुख यांचा कथाकथन कार्यक्रम पार पडला. नित्यसेवा येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश पिंपळे होते. यावेळी सरस्वती पूजन व औक्षण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. योगेश पिंपळे यांनी समर कॅम्पला मिळालेला प्रतिसाद, घेण्यात आलेले उपक्रम आणि प्रतिष्ठानकडून सादर होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी साहित्यिक बाळासाहेब देशमुख यांनी मानवतेचा धर्म व चिमुरडी या कथा सादर केल्या. छोट्या खेड्यात राहणारी डोळस, श्रध्दाळू सखुबाई मूर्तीतला देव पाहण्यापेक्षा मुलांना सर्व जगताला घडविणाऱ्या ज्ञानदान टकरणाऱ्या शिक्षकाला ती मान देते. शिक्षकाला ती सरस्वती देवीचा पूजक मानते. कोणतेही भाडे, पैसे न घेता वर्षानुवर्ष आपल्या वाड्यातील खोली शिक्षकांना मोफत राहावयास देते. गोरगरिबांविषयी तिच्यात माणुसकीचा गहीवर दाटून येतो. तिच्या कार्यात आपल्याला बहिणाबाई चौधरी, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वसा दिसून येतो. चिमुरडी या कथेमधील चार वर्षाची छोटी बालिका, आजोबांना अनेक प्रश्न विचारत, कोडी घालते. त्यांची मुलाखत घेते. प्रश्नांचा भडीमार करत, आजोबांची भंबेरी उडवते. लहान मुलांची चिकित्सक वृत्ती आणि आजोबांची समर्पक उत्तरे, मुलांना वेगळीच शिकवण देऊन जातात. या कथेतून देशमुखांनी लहान मुलांचे भावविश्व उलगडून दाखविले. अभिनय, देहबोलीसह सादर केलेल्या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षकवृंद, मंत्रमुग्ध होऊनगेले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेश्मा पवने, श्वेता जाधव, शिवम गायकवाड, प्रज्ञा अष्टेकर, साक्षी जाधव, सार्थक खोमणे यांनी सहकार्य केले.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी मेकॅनिकल इंजिनिअर २८ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड

**नगर तालुका । विजय मते**

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट विभागामार्फत मेकॅनिकल इंजिनिअर विभागातील विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने एकुण ७ कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष मेकॅनिकल इंजिनिअर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मेकॅनिकल इंजीनियरिंग विभागातील एकुण २८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. पुणे येथील साऊथर्न ग्लोबल सर्विसेस, सीएइ



सोल्युशन, क्यू एच स्टालब्रो, एपीटॉम तर अहिल्यानगर येथील वांबोरी मधील केएसबी पॅम्प, लेअर्स सोलर पीव्ही सिस्टीम या मेकॅनिकल क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना सरासरी चार लाख आणि कमाल साडेसहा लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन तथा पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी.एम. गायकवाड, डायरेक्टर-टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे व प्राचार्य डॉ. उदय नाईक, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. रविंद्र नवथर, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. सुदर्शन दिवटे विभागीय शिक्षक समन्वयक प्रा. दत्तात्रय नन्नवरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**वैष्णवी अशोक शिंदे हिची पुणे येथील किर्लो स्कर न्यूमॅटिक या कंपनीत निवड होऊन सर्वात मोठे पॅकेज मिळाले. याबाबत ती म्हणाली ही गोष्ट माझ्यासाठी गौरवास्पद आहे. त्याप्रमाणे डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालया मधील मेकॅनिकल विभागासाठी अभिमानाची देखील बाब आहे. माझ्या यशामध्ये आई-वडील कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्लेसमेंट ऑफिसर यांचे मार्गदर्शन लाभल्याने मी यश मिळवू शकले.**



# विजया रौंदळ यांचे निधन

**नेवासा । प्रतिनिधी**

तालुक्यातील कांगोणी येथील रौंदळवस्ती येथील विजया बाबासाहेब रौंदळ, वय ४५ यांचे अल्पशः आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सासरे, दोन भाऊ, असा परिवार आहे. माधव रौंदळ यांच्या सुनबाई, बाबासाहेब रौंदळ यांच्या पत्नी, तर



शिक्षक बाळासाहेब रौंदळ व साईनाथ रौदळ यांच्या त्या भावजयी होत.

# सिंध प्रांतातील उद्रेकाने शरीफ सरकारची डोकेदुखी वाढली

पाकिस्तानातील शरीफ सरकारपुढील आव्हाने कमी होण्याऐवजी वाढतच चालली. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानची जगभर नाचक्की झाली. भारताने पाकिस्तानात घुसून जो तडाखा दिला त्याने पाकिस्तानची जनता शहाबाज शरीफ सरकारवर चिडून आहे. त्यात पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानसाठी बलुचिस्तानी नागरिकांनी सरकारविरोधात एल्गार पुकारून सरकारला आव्हान दिले. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढा पुकारून स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा देखील केली. सीमेवर भारतीय लष्कराशी आणि सीमेच्या आत बलुचिस्तान लीबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान अक्षरशः भिकेकंगाल झाला. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याने पाकिस्तान जगात भिकेचा कटोरा घेऊन फिरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला निधी दिला असला तरी त्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. पाकिस्तानात महागाई इतकी वाढली आहे की, पाकिस्तानी नागरिकांना एकवेळचे जेवण मिळणे देखील मुश्किल झाले. महागाईने जनता मेटाकुटीला आली. त्यात भारताने सिंधू जलकरार स्थगित केल्याने पाकिस्तानी नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ आली. जर भारताने हा जलकरार पूर्ववत केला नाही तर भविष्यात पाकिस्तानात मोठी पाणीबाणी निर्माण होऊ शकते. यावर तोडगा म्हणून पाकिस्तानच्या शरीफ सरकारने ग्रीन पाकिस्तान इनिशीएटीव्ह हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प चीनच्या मदतीने पकिस्तान साकारणार आहे. या प्रकल्पास पाकिस्तानची दुसरी हरितक्रांती संबोधली जाते. या प्रकल्पाअंतर्गत पाकिस्तानातील चेलिस्तान वाळवंटातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी शेकडो किलोमिटरचे सहा कालवे काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाकडे पाकिस्तान सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहण्यात येत आहे, मात्र हाच प्रकल्प आता पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनला आहे, कारण या प्रकल्पाने सिंध प्रांतात येणारे पाणी पंजाब प्रांतात वळवले जाईल, असे सिंध प्रांतातील नागरिकांना वाटते. आपल्या हक्काचे पाणी पंजाब प्रांताला मिळणार असल्याने सिंध प्रांतातील नागरिक प्रचंड अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेतूनच तेथील नागरिक रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकारविरुद्ध आंदोलन करत आहेत. भारत आणि बलुचिस्तान आर्मीपुढे हतबल झालेल्या शरीफ सरकारपुढे ही नवी डोकेदुखी उभी ठाकली. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील लोक आता सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. या आंदोलनाला हिंसक वळणदेखील लागले.




संतप्त आंदोलकांनी सिंध प्रांतातील गृहमंत्र्यांच्या घराला आग लावली. यावेळी झालेल्या गोळीबारात तीन नागरिकांचा मृत्यू झाला. हे आंदोलन वाढतच चालले. पाकिस्तान लष्कर आणि सरकारमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. पाकिस्तान सरकार सिंध प्रांतावर कायम अन्याय करीत असल्याची भावना तेथील नागरिकांची झाली. या अन्यायाविरोधात सिंध प्रांतातील नागरिक आवाज उठवत आहेत. इतकेच नाही तर या आंदोलनात सिंध प्रांतातील नागरिकांनी स्वतंत्र सिंधू देशाची मागणी केली आहे. ही मागील आताच नव्हे तर मागील काही वर्षांपासून करण्यात येत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात हिंदूधर्मीय नागरिक मोठ्या प्रमाणात राहतात. या नागरिकांवर गेल्या काही वर्षांपासून अन्यायाची मालिका सुरू असून ही अन्यायाची मालिका संपावी आणि सिंध प्रांतातील हिंदू नागरिकांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावेत यासाठी जगभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. मागील काही काळात पाकिस्तानातील हिंदू महिलांवर विशेषतः सिंधी हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत कमालीची वाढ झाली. या भागातील मुलींचे, महिलांचे फसवून, पळवून, सक्तीने धर्मांतर केले जात आहे. वाढत्या अत्याचारामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले. वारंवार सरकारला विनंती करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तेथील नागरिक अस्वस्थ होते. त्यातच या नव्या प्रकल्पाची भर पडल्याने तेथील नागरिकांची अस्वस्थता आणखी वाढली. आपल्यावर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्वतंत्र सिंधू देशाशिवाय पर्याय नाही अशीच भावना तेथील नागरिकांची झाली आहे त्यातूनच स्वतंत्र सिंधू देशाची मागणी करण्यात आली. मागील वर्षीच स्वतंत्र सिंधू देशाला भारत आणि अमेरिकेने पाठिंबा द्यावा, अशी विनंती करण्यात आली होती. त्यावर दोन्ही देशांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भविष्यात या दोन्ही देशांना आंदोलनकर्त्यांच्या या मागणीची दखल घ्यावीच लागेल आणि जेंव्हा हे दोन्ही देश या मागणीची दखल घेतील तेंव्हा पाकिस्तानची आणखी शकले झालेली असतील.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुसूत्रतेसाठी तालुका समितीची बैठक

## अकोले तालुका गटशिक्षणाधिकारी विस्तार अधिकारी व प्राचार्य, तंत्रस्नेही शिक्षक उपस्थित

**अकोले । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता ११ वी ऑनलाइन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने २५ फेब्रुवारी व ०६ मे रोजी शासननिर्णय निर्गमित केल्याप्रमाणे अंमलबजावणी सुरू केली आहे.

यासाठी अकोले पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी व ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया तालुका समितीचे अध्यक्ष अरविंद कुमावत व समितीच्या सचिव विस्तार अधिकारी सविता कचरे, विषयतज्ञ महेश पाडेकर, सदस्य प्राचार्य गणपत धुमाळ, तंत्रस्नेही शिक्षक चंद्रशेखर हासे, अकोले महाविद्यालयातील उपप्राचार्य चांगदेव डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत अकोले महाविद्यालयात के. बी. दादा सभागृहात सहविचार सभा संपन्न झाली. यावेळी तालुक्यातील सर्व प्राचार्य, नोडल शिक्षक, तंत्रस्नेही शिक्षक उपस्थित होते यावेळी प्रत्यक्ष केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती विस्तार अधिकारी



सविता कचरे, समिती सदस्य विषय तज्ञ महेश पाडेकर, समिती सदस्य चंद्रशेखर हासे यांनी दिली यावेळी विद्यार्थी पालकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात समुपदेशन कक्षाची स्थापना करण्यास सांगितले तसेच प्रवेश प्रक्रिया संदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली यामध्ये व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्यांक कोटा, इन हाऊस कोटा, विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चिती केल्यानंतर करावयाची कार्यवाही, विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यानंतर करावयाची कार्यवाही, कॉलेज निवड करणे, याविषयी सविस्तर मुद्दे निहाय माहिती दिली. सभेच्या अध्यक्षस्थानी अकोले पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत. होते त्यांनी शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तेनुसारच प्रवेश प्रक्रिया होईल, विद्यार्थी व पालक यांच्या सर्व समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ही ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सर्वांसाठी नवीन आहे. यासाठी समुपदेशन कक्षाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याच्या सूचना अरविंद कुमावत यांनी दिल्या. शासनाच्या सर्व सूचना आल्यानंतर वेळोवेळी सर्व नोडल शिक्षक, प्राचार्य तंत्रस्नेही शिक्षकांना दिल्या जातील व दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाइन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया करावी.दररोजची आकडेवारी ही पंचायत समिती अकोले यांच्याकडे द्यावी. यावेळी समिती सचिव विस्तार अधिकारी सविता कचरे यांनी अकोले तालुक्यातील सर्व प्रवेश प्रक्रिया ही सुरळीत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तालुक्यातील सर्व उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य नोडल शिक्षक, तंत्रस्नेही शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश पाडेकर यांनी केले.

### सदानंद करंदीकर यांनी पत्नी सुमती यांच्या स्मरणार्थ

# प्रधानमंत्री व मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिले २० लाख रुपये




**मुंबई । प्रतिनिधी**

डोंबिवलीतील सदानंद विष्णू करंदीकर (मूळ गाव आचरा, जि. सिंधुदुर्ग) यांनी मंत्रालयात येऊन प्रधानमंत्री व मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रत्येकी १० लाख रुपयांचे दोन धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. करंदीकर खासगी कंपनीतून निवृत्त झाले असून शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या त्यांच्या पत्नी सुमती करंदीकर यांचे गतवर्षी कर्करोगाने निधन झाले. अपत्य नसल्याने करंदीकर दाम्पत्य नेरुळ येथील आनंद वृद्धाश्रमात वास्तव्यास होते. कर्करोगग्रस्तांच्या नातेवाईकांची धावपळ आणि पैशांसाठी करावी लागणारी धडपड करंदीकर यांनी जवळून पाहिली. त्यामुळे त्यांनी पत्नीच्या स्मरणार्थ आपल्या कमाईतील मोठा भाग समाजालाच परत करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी अध्यात्म आणि शेतीत रस असलेल्या ८२ वर्षांच्या करंदीकर यांनी मंत्रालयाकडे धाव घेतली. सध्या करंदीकर त्यांच्या भगिनी प्रभा श्रीराम शितूत यांच्याकडे वास्तव्यास आहेत. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या दातृत्वास नमन केले.

# २४ मे रोजी कथाकट्टाचे ‘भय इथले संपत नाही’ नाट्यप्रयोग

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शनिवारी ता.२४ मे रोजी ब्लॅक बॉक्स क्रिएशन्स निर्मित, कथाकट्टा यांच्यावतीने ‘भय इथले संपत नाही’ हा गुढ व भय कथाचा नाट्यअनुभव देणारा अभिवाचनाचा प्रयोग ऊर्जा रंग भवन, अहिल्यानगर येथे संध्याकाळी ७:३० वाजता सादर होणार आहे. या दीर्घांक प्रयोगामधे आशुतोष उकिडवे आणि नारायण धारप व रत्नाकर मतकरी या लेखकांच्या कथांचे अभिवाचन या प्रयोगात प्रभावीपणे केले जाते. नेपथ्य, प्रकाश योजना आणि संगीताचा परिणामकारक उपयोग यामुळे प्रेक्षकांना प्रयोगाचा उत्तम अनुभव मिळतो. पात्रांच्या गरजेनुसार सुसंगत रंगभूषा आणि वेशभूषाचा वापर केला आहे. कलाकार वेगवेगळ्या भूमिका साकारून रसिकांना खिळवून ठेवतात. या प्रयोगाची संकल्पना आणि दिग्दर्शन देवेंद्र भिडे यांनी केले. मानसी जोगळेकर, पूजा गिरी, डॉ. समीर डोलारे, पराग फडके, माधव सोमण, रोमा गिरी, मधूर डोलारे, राजा उत्तूरकर, रेणुका भिडे, देवेंद्र भिडे हे अभिवाचक कथा सक्षमपणे प्रेक्षकांपर्यंत पोचवितात. त्यांना सचिन यंदे, आरोही डोलारे, अंतरा डोलारे यांची ही साथ मिळते. प्रकाशयोजना योगेंद्र साने, संगीत संयोजन निरंजन देशपांडे,



रंगभूष नरेंद्र वीर असून अभिवाचन प्रयोगाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यापुर्वी पुणे, मुंबई येथे प्रयोग झाले असून आता अहिल्यानगरमध्ये पहिला प्रयोग होत आहे. ‘भय इथले संपत नाही’ एक अनपेक्षित पध्दतीने भय व गूढ कथांचा नाट्यानुभव देणारा अभिवाचनाचा हा प्रयोग पाहण्यास प्रेक्षकांनी जरूर यावे. सादरीकरण कालावधी सलग ९० मिनिटे आहे. अधिक माहितीसाठी आणि तिकिटासाठी ८६००२४४००० क्रमांकावर संपर्क साधावा, अशी माहिती देवेंद्र भिडे यांनी दिली.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीमध्ये भरभराट शक्य- डॉ. साताप्पा खरबडे

**राहुरी । प्रतिनिधी**

विद्यार्थी आणि प्राध्यापकांना कृषी संशोधन क्षेत्रातील विविध नवीन उपक्रम आणि शाश्वत विकासाचे नेतृत्व करण्यासाठी महत्त्वाची संधी आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीमध्ये उत्पादन, उत्पादकता आणि भरभराट प्राप्त होऊ शकते असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असलेल्या काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स या प्रकल्पामध्ये चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन अधिष्ठाता



डॉ. साताप्पा खरबडे बोलत होते. या चर्चासत्रासाठी मार्गदर्शक म्हणुन संरक्षण निधी आणि गोड्या पाण्याच्या संस्थेचे पोस्ट डॉक्टरेट संशोधक डॉ. गजानन कोठावडे उपस्थित होते. यावेळी कृषी अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनील कदम, कृषी वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजू अमोलीक, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नितीन दानवले, कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल व सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते. यावेळी डॉ. गजानन कोठावडे यांनी सूक्ष्म नोंदी घेणारे कृषिमधील आधुनिक उपकरणे या विषयावर व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी वनस्पतील ताण, रोग व किडींचा प्रादुर्भाव, मृदेतील पोषक तत्वांचे घटक, पाण्याचे संतुलन यासारख्या न दिसणाऱ्या कृषी धोक्याबद्दल स्पेक्टरल इमेजिंग, बायोसिंसेस, रिमोट सेन्सिंग, ऑप्टिकल सेन्सिंग साधने आणि आय.ओ. टी. इत्यादी कृषी क्षेत्रातील डिजिटल तंत्रज्ञानाबद्दल विद्यार्थी व शास्त्रज्ञांना सविस्तर माहिती दिली. या चर्चासत्राचे प्रास्ताविक, स्वागत व पाहुण्यांची ओळख डॉ. सुनील कदम यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर आभार डॉ. वैभव मालुंजकर यांनी मानले. या कार्यक्रमाचे समन्वयक इंजि. अभिषेक दातीर होते. या चर्चासत्रासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा खाते

## विरोधकांसह सामाजिक क्षेत्रातूनही तीव्र नाराजी



राज्य मंत्रिमंडळ विस्तारात छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा खाते देण्यात आले असून, या निर्णयावर राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजपाने भुजबळ यांच्यावर पूर्वी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची पार्श्वभूमी लक्षात घेता, त्यांची मंत्रीपदावर नियुक्ती अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरत आहे. भाजपाचे सभ्य नेते किरीट सोमय्या यांनी यापूर्वी भुजबळ यांच्याविरोधात पत्रकार परिषदेत आर्थिक गैरव्यवहाराचे पुरावे सादर केले होते.

मात्र आता त्यांच्याच सरकारमध्ये भुजबळांचा समावेश झाल्याने विरोधकांनी भाजपा नेतृत्वावर ‘दुटप्पी भूमिके’चा आरोप करत आहे. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी “भाजपाकडे वॉशिंग मशीन आहे, त्यात धुतल्यावर भ्रष्टाचाऱ्यांचे पाप धुतले जाते,” असे म्हणत जोरदार टोला लगावला. सामाजिक कार्यकर्त्यांची संतप्त प्रतिक्रिया : भ्रष्टाचारविरोधी कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटले की, “भ्रष्टाचार करणाऱ्यांना मंत्रीपद देणे म्हणजे जनतेच्या न्यायाच्या अपेक्षेचा अपमान आहे.” मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी भुजबळ यांची मंत्रीपदी नियुक्ती मराठा समाजाचा अपमान असल्याचे सांगितले. त्यांनी म्हटले, “छगन भुजबळ हे मराठा समाजाचा द्वेष करतात, असे असूनही अजित पवारांनी त्यांना मंत्री केले, याचा फटका अजित पवार गटाला निवडणुकीत निश्चितच बसणार आहे.” राजकीय निरीक्षकांच्या मते, या नियुक्तीमुळे सत्ताधारी आघाडीला मराठा समाजासह भ्रष्टाचारविरोधी मतदारांचा रोष पत्करावा लागू शकतो. विरोधकांनी या मुद्यावर निवडणूक प्रचारात आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



तुषार सोनवणे
अहमदनगर
७९७२३४४४७४

समाजसंवाद